# घर

"घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती" ही लोकप्रिय कविता आपण अनेकवेळा ऐकली असेल. चार भिंतींचे घर बनत असले तरी त्यात आपुलकीचा जिव्हाळा, नात्याचे बंध असतात.

"गोजिरवाणी जशी वासरे
प्रेमळ माझी गुणी लेकरे
स्वर्ग अवतरे घरात माझ्या
आनंदाचे पडती सडे --"

सुखासमाधानाने भरलेलं घर जणू काही स्वर्गच आहे असं वाटतं म्हणून कोठेही गेलो तरी 'घरी' परत यावसं वाटतं. "आपलं आपलं घर बरं" असं वाटते. दिवसभर काम केलेल्या माणसाला कधी घरी परतू असं होतं. घर असूनही 'घरी' जावेसे वाटत नाही तो दुर्दैवी, पण ज्यांना संध्याकाळी परतायला घरच नसते त्यांच्याबद्दल दया, करूणा दाटून येते. दुकानासमोर, फुटपाथवर, स्टेशनवर रात्र काढणारे कमनशिबीच!

आयुष्यभर भाड्याच्या घरात राहणाऱ्याला स्वतःच्या मालकीचे छोटसे का होईना, घर असावे वाटते. पैसा कमावणे, सांभाळणे आणि 'वाढविणे' या सर्वांत घरासारखा मार्ग नाही. म्हणूनच घर बांधणे, रंगविणे, स्वच्छ नीटनेटके ठेवणे, सजविणे, सोयी सवलती करणे या संबंधीत व्यवसाय खूप तेजीत चालतात. बांधकाम साहित्य, दरवाजे, कड्या कुलपे, फरशा, नावदाने, झुंबर, डोअरबेल, कुंड्या झाडं, तुळशी वृंदावन, दिवे, फर्निचर, शोकेस, शोभेच्या वस्तू, देवघर, बेडशीट्स, पडदे, फ्रीज

classmate
Date
Page

(२)

टिव्ही, ओव्हन सारख्या वस्तू ! या सारख्या वस्तुंचा बाजार भरभरून वहातोय. घरासंबंधी कोणत्याच व्यवसायाला मरण नाही!

"घराची कथा अंगण सांगत" असं म्हणतात. पूर्वी घराला अंगण असे, त्यावर रांगोळी, एखादं तुळशीवृंदावन, चार-दोन फुलझाडे असली की घर 'सात्विक' दिसे. आता स्वरूप बदललेय - बंगला असेल तर सजावट, कुंड्या, लॅम्प, एखादी देवाची मूर्ती - चित्र, सुरेख संगीत वाजणारी डोअर बेल, नक्षीदार टाईल्स, घराचे झोकात लिहिलेले ऐटबाज नाव, सुंदर फाटक आणि 'कुत्र्यापासून सावध' अशी पाटी!

फ्लॅटमध्ये रहाणाऱ्यांची वेगळीच तऱ्हा! दरवाजे सदैव बंद! मात्र दाराला तोरण, नामफलक, एखादी कुंडी, दारापुढचे रांगोळीचे 'स्टीकर', चप्पल बूट ठेवण्याचे स्टँड - रूपाट! संपले!

आपण एकदा घरात प्रवेश केला की दर्शनी खोली आपल्याला घर रसिक, कलावंत, चोखंदळ आहे, साधे आहे की नुसतेच 'लई भारी' आहे हे सांगते. कशावरून कशावरून? अहो, घरातल्या सामानावरून! पूर्वी एखादे "मर्फी बॉय" चे कॅलेंडर, देवदेवतांच्या तसबिरी, घरातल्यांचे फोटो, साधीशी बैठक, खुंटीवर छत्री पिवशी लटकावलेली असे. श्रीमंतांकडे एखादे जाजम, टेबलखुर्ची, क्वचित झुंबर दिसे, आज मात्र भिंतीवरील कॅलेंडरची जागा सुरेख अशा लँडस्केपने / फोटोने घेतली आहे. टी.व्ही, सोफा, शोकेस, फुलदाणी हे आदी अनिवार्य!

③

लाईट्स, तर खूप प्रकारचे आहेत. गालिचे, सतरंज्या यांचेही असंख्य प्रकार आहेत. पडद्यांचेही तसेच! यातील कोणत्या गोष्टींची निवड केली आहे यापेक्षा "करू शकतो" हे दाखविण्याचा केवळा सोस!

यानंतर नंबर लागतो तो स्वयंपाकघराचा. स्टोव्ह-चूल जाऊन गॅसवर, उभ्याने स्वयंपाक सुरू झाला. पितळी डबे, स्टीलचे डबे, प्लॅस्टीकचे डबे - टप्परवेअरचे डबे आले. तोट्या पितळेच्या घागरी जाऊन, स्टीलची पिपे आली - ती ही जाऊन आता घरोघरी "केन्ट" बसवलेले दिसते. उखळ, जातं, पाटा वरवंटा जाऊन मिक्सर, फूड प्रोसेसर, ओव्हन, फ्रीज आले आहे. 'झरोका' जाऊन आता एक्झॉस्ट फॅन आला आहे. सर्व 'मराठी' जाऊन वेगळेच, आधुनिकता देणारी हा बदल आहे असे नाही तुम्हाला वाटत?

दिवसभर श्रमून विश्रांती घेण्याची जागा म्हणजे शयनगृह! पूर्वी गाद्या घालणे, काढणे, अंथरूण-पांघरूण यांच्या घड्या घालणे, हे काम असे. आता 'बेड' असतो, आणि तो कायम 'तयार' असतो! या खोलीतही पुस्तकांचे कपाट/रॅक, स्टडी टेबल, वॉर्डरोब, नाईटलॅम्प असतोच!

या सर्व गोष्टी 'एकाच' खोलीत असणारेही काही कमी नाहीत! एकट्याची असते ती खोली - लग्न झाले की 'घर' होते! 'घरवाली' आलेली असते ना!

झोपडी, कौलारू घरे, गच्चीचे घर, बैठे घर, वाडा, फ्लॅट, बंगला, माडी, चाळ, रो हाऊस अशी नावे जरी उच्चारली तरी त्या त्या प्रकारचे घर डोळ्यापुढे उभे रहाते. घरचं पण

राजाचे असले की राजवाडा, राणीचे असले तर महाल! साधुंचे असले की आश्रम, सिंहाचे असेल तर गुहा, उंदराचे असेल तर बीळ, पक्षांचे घरटे, घोड्याचा तबेला आणि गाईचा गोठा!

लहान - मोठे कसेही असो, घर प्रत्येकालाच प्रिय असते. प्रत्येक जण आपल्या परीने घर निटनेटके ठेवतच असतो पण घर 'बनते' ते घरातल्या माणसांनी. घरात प्रवेश केल्यावर घरातील माणसे आपलं कसं स्वागत करतात त्यावर तेथे किती 'थांबायचे' हे आपण ठरवतो. 'घरी तेच दारी' असते. थोड्याफार फरकाने 'घर घरकी कहानी' तीच असते. 'सातच्या आत घरात' ही सुरक्षिततेची पावती असते. 'आमच्या घरचं वळण' हे शब्द घराविषयी अभिमानाचे द्योतक असते.

आणि म्हणूनच हॉटेलमधे जेवायला गेलो तरी जेवण 'घरच्यासारखे' लागते. स्वागत करताना यजमान म्हणतात "या या, घर आपलेच आहे!" मुलीला चांगले घर मिळाले असे म्हणतांना घरातील श्रीमंतीपेक्षा चांगल्या माणसांकडे निर्देश असतो. हे सारे घरातील स्त्रीवर जास्त अवलंबून असते. भावाने घरी बोलावले आणि भावजयीने तोंड फिरवले तर आपण जाऊ का? म्हणूनच 'गृहलक्ष्मी' शब्द आहे, 'गृहविष्णू' नाही! शिकलेली, सुसंस्कृत, समजूतदार स्त्री घराचा स्वर्ग करते!



सौ. वसुंधरा कुलकर्णी.
मो.नं. 9689135255